Vol 5 Issue 10 April 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

GRT

# महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेतील शिवसेनेची भूमिका

प्रा. नारायण राजुरवार
राज्यशास्त्र विभाग, मु.सा.काकडे महाविद्यालय,
सोमेश्वर नगर ता. बारामती.

## प्रस्तावना

महाराष्ट्राच्या राजकिय प्रक्रियेमध्ये १६८६ ते १६६६ या काळात जे स्थित्यंतर घडून आले त्यास राज्यपातळीवरच्या दोन पक्षांचा हातभार लागला. शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस हे ते दोन पक्ष आहेत. त्यातही या स्थित्यंतरची सुरूवात झाली ती शिवसेनेच्या विस्तारापासून महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाच्या व्यापक सामाजिक आधारांना खिंडार पाडण्यासाठी कोणताही एक विरोधी पक्ष पुरा पडत नाही. हा १६७७ पासूनचा अनूभव पाठीशी असल्यामुळे शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांनी महाराष्ट्रात आघाडी करण्याचा निर्णय घेतला आणि महाराष्ट्रातील पक्षपद्धतीला आणि राजकारणाला चालना मिळाली.

ज्यावेळी या दोन पक्षानी आघाडी केली तेव्हा दोघांचेही कायदेमंडळातील बळ नगण्य होते. पण शिवसेनेचा त्या काळात विस्तार होत होता. आपण राज्याच्या राजकारणात महत्त्वाची भुमिका बजावयाची आणि केंद्रात भाजपला साथ द्यायची अशी शिवसेनेची त्यावेळी दृष्टी होती. नव्वदीच्या दशकात देशाचे व राज्याचे राजकारण झपाट्याने बदलले. शिवसेना (भाजपच्या साथीने) राज्यामध्ये सत्तेवर आली. आणि त्यानतर ३ वर्षानी भाजप प्रणित आघाडी केंद्रात सत्तेवर आली. मात्र पाच वर्षांनंतर राज्यात शिवसेना भाजपच्या हातून सत्ता निसटली ती २००४ मध्येही परत आली नाही.

या सर्व कालखंडात (१६७६ ते २०१६) या ना त्या कारणाने शिवसेना हा राज्यातला एक महत्त्वाचा पक्ष राहीला आहे.



शिवसेनेच्या या राजकीय विस्ताराचा आढावा घेतानाच महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत शिवसेना कशी विकसीत होत गेली व पुढील काळात कोणत्या राजकीय आणि संघटनात्मक चौकटीत शिवसेनेने हा विस्तार साध्य केला आहे.

तसेच शिवसेना हा इतर अनेक प्रादेशिक पक्षासारखाच एक पक्ष आहे की, भारतीय राजकारणात डोके व काढू पाहणाऱ्या लोकशाही-विसंगत प्रवृत्तीचे प्रतिनिधीत्व शिवसेना करते याचा अभ्यास करणे.

शिवसेनेच्या एकूण वाटचालीमध्ये आणि विस्तारात चळवळ करणाऱ्या एका गटापासून राजकीय पक्षामध्ये झालेले स्थित्यंतर हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या वाटचालीत अधूनमधून काही कार्यकर्ते शिवसेनेतून बाहेर पडले तरी, शिवसेनेच्या वाटचालीला धक्का पोहचला नाही. पण १६६१ पासून तीन वेळा शिवसेनेला मोठे खिंडार पाडणाऱ्या घटना घडल्या. याच काळात (१६६०) नंतर शिवसेनेचे निव्वळ पक्षसंघटनेत स्थित्यंतर झाले. जनक्षोभ निर्माण करणारी चळवळ म्हणून शिवसेनेच्या अस्तित्वाला १६६५ नंतर तडा बसला. आज घडीला शिवसेना किती काळ टिकणार हा प्रश्न अनेक निरीक्षक आणि भाष्यकार विचारताना दिसतात.

१६७५ ते १६७७ या आणिबाणीच्या काळात शिवसेना निष्क्रीय होती. त्यानंतरच्या काळात तिच्या अस्तित्वाविषयी अशाच शंका घेतल्या जात होत्या पण १६८० च्या दशकात मराठी हितसंबंधाच्या मुद्यापेक्षा हिंदूत्वाच्या मुद्याला प्राधान्य दिल आणि त्या आधारावर मराठवाडा आणि विदर्भात आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. १६६० आणि २००४ मध्ये शिवसेनेची सत्तरीच्या दशकात तग धरू शकली त्या अद्यापही अस्तित्वात आहेतच अशा परिस्थितीत शिवसेनेच्या भवीतव्याविषयी प्रश्न का उभे राहतात.

याला पुढील उत्तरे आहेत. २००४ नंतर एकूण देशपातळीवर हिंदूत्वाचा बोलबाला कमी झाला असून भाजपच्या

पराभवानंतर शिवसेना केंद्रातही सत्तेपासून दूर झाली आहे. आणि सत्तेवर आल्याचा अनुभव घेतल्यानंतर सत्तेपासून दूर राहणे पक्षाला व त्याच्या कार्यकर्त्यांना बरेच वेळा अवघड जाते. शिवसेनेपुरते बोलायचे झाले तर १९९५ मध्ये प्रथम सत्तेवर आल्यापासून शिवसेनेचे म्हणून जे खास वैशिष्ट्यो आहे. आंदोलनात्मक आणि थेट कृतीच्या मार्गाने कार्यकर्त्यांना सक्रीय ठेवणे तेच मागे पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे सत्ताच्युती आणि हिंदुत्वाच्या विचाराची पिछेहाट हे घटक भावी वाटचालीतले अडसर ठरू शकतात.

तसेच स्वतःच्या नेतृत्वाविषयी अपार भक्ती भाव निर्माण करू शकणारे शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे हे वयोमानानुसार त्या काळात बरेच कमी सक्रीय होते. आम कार्यकर्त्याचा उत्साह कमी होण्यात या घटकाचा प्रभाव पडू शकतो. तसेच खुद्द शिवसेनेत फाटाफूट होवून दोन मोठे नेते २००४ नंतर पक्ष सोडून गेले आहेत. विशेषतः बाळ ठाकरे यांच्या प्रभावी नेतृत्वाचा वारसा उद्धव ठाकरे यांच्याकडे का राज ठाकरे यांच्याकडे जाणार हा प्रश्न अनुत्तरीय असताना राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष स्थापन केल्यामुळे शिवसेनेच्या संघटनात्मक वाटचालीकडे काही प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून सध्या वर्तमान परिस्थितीत महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रीयेतील शिवसेनेच्या भूमिकेच्या अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

त्यानंतर अनेक शिवसेनेचे नेते, कार्यकर्ते कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेसध्ये सहभागी झाले. विशेषतः राज ठाकरेचे शिवसेना सोडून वेगळा पक्ष स्थापन केल्यामुळे शिवसेनेसमोर फार मोठे आव्हान निर्माण झाले. राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन करून शिवसेनेचा जनाधार/मतदार आपल्याकडे आकर्षित करून शिवसेनेला फार मोठे नुकसान सहन करावे लागले.

२००९ च्या विधानसभा निवडणूकीत मनसेमुळे शिवसेनेचे फार मोठे नुकसान झाले. २००७ च्या मुंबई महानगर पालिकेत म.न.से. ला घवघवीत यश मिळून २७ नगरसेवक निवडून आले. तसेच २००९ च्या विधानसभा निवडणूकीत मनसेचे १३ आमदार विधानसभेत निवडून आले. परंतू अनेक ठिकाणी मनसेच्या उमेद्वारामुळे भा.ज.पा. सेनेचे उमेद्वार पराभूत झाले. जवळपास ४० विधानसभा मतदार संघात मनसेच्या उमेद्वारामुळे सेनेच्या उमेद्वारांचा पराभव झाला. पुन्हा एकदा मनसेमुळे सेना-भाजपाचे महाराष्ट्रात सरकार स्थापण्याचे स्वप्न भंग पावले व महाराष्ट्रात कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे सरकार सत्तेवर आले. नंतरच्या काळात अनेक सेना नेते, कार्यकर्ते शिवसेना सोडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात सहभागी झाले..शिवसेना दिवसेंदिवस कमकूवत होत होती

२००९ च्या विधानसभा निवडणूकांनेतर महाराष्ट्रात फार मोठ्याा प्रमाणात दूष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली. हजारो शेतकऱ्यांनी मराठवाड्यात आत्महत्या केल्या. यानंतर उद्धव ठाकरेंनी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे करून शेतकऱ्यांच्या असंतोषाला वाचा फोडली. शिवसेनेने अनेक आंदोलने, मोर्चे, उठाव केले व शेतकऱ्याचा सातबारा कोरा झालाच पाहिजे यासाठी शेतकऱ्यांना कर्ज माफी झाली पाहिजे अशी मागणी केली. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर शिवसेनेने आंदोलने करून महाराष्ट्र सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण केला.

२००४ ते २०१४ या काळात राष्ट्रीय पातळीवर सत्तेत असलेल्या यूपीए सरकारच्या विरोधात वातावरण तयार होत होते. यूपीए२ मध्ये कॉमनवेल्थ घोटाळा, टूजी घोटाळा, कोळसा घोटाळा असे अनेक घोटाळे समोर येत होते. संपूर्ण देशभरात कॉंग्रेसच्या विरोधात वातावरण तयार झाले होते. याच काळात इंडिया अगेन्स्ट करप्शन नावाचे आंदोलन, अण्णा हजारे, अरवींद केजरीवाल, किरण बेदी या सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी 'जनलोकपाल विधेयक' मंजूर व्हावे यासाठी अण्णा हजारेच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन उभे केले. या जनआंदोलनामूळे देशभरासह महाराष्ट्रातही कॉंग्रेस सरकारच्या विरोधात वातावरण तयार झाले. या संधीचा फायदा विरोधी पक्ष भाजपाने करून घेतला. १७ सप्टेंबर २०१३ रोजी गोवा अधिवेशनात भाजपाने २०१४ च्या लोकसभा निवडणूकीचे पंतप्रधान पदाचे उमेद्वार म्हणून नरेंद्र मोदीचे नाव घोषित केले. व त्यानंतर २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रात शिवसेनेने भाजपा सोबत यूती करून लोकसभा निवडणूक लढवली. या निवडणूकीत शिवसेनेचे अठरा खासदार निवडून आले व शिवसेना राष्ट्रीय पातळीवरील भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारमध्ये सहभागी झाली. या सरकारमध्ये कमी महत्त्वाचे खाते अवजड उद्योग मंत्रालय श्री. आनंत गिते यांना मिळाले. यामुळे सेना नेतृत्व भाजपा नेतृत्वावर वेळोवेळी असंतोष व्यक्त करताना दिसून येते.

केंद्रात आज भाजपा सत्तेत आल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचे राजकीय समीकरण बदलले. महाराष्ट्रात भाजपला लोकसभेच्या २४ जागा निवडून आणता आल्या. एकूण २८८ विधानसभा मतदार संघापैकी जवळपास १८० विधानसभा मतदार संघात भाजपा उमेद्वाराला आघाडी प्राप्त झाली होती. त्यामुळे भाजपा महाराष्ट्रात स्वबळावर सत्तेत येण्याचे स्वप्न पाहत होता.

१९८९ साली हिंदूत्वाच्या आधारावर तयार झालेली सेना, भाजपा, यूती २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत संपूष्टात आली. २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत सेना-भाजपा यांच्यातच प्रामूख्याने लढती झाल्या. देशभरात मोदी लाट निर्माण झाली होती. त्याप्रमाणे महाराष्ट्रातही मोदींनी जवळपास २५ जाहीर सभा घेऊन प्रचार केला. २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत भाजपाला १२२ जागा व शिवसेनेला ६६ जागा मिळाल्या.

शिवसेनेच्या प्रचाराची संपूर्ण जबाबदारी पक्षप्रमूख उध्दवजी ठाकरे यांनी सांभाळली. या निवडणूकीत संपूर्ण महाराष्ट्रात सेनेबाबत सहानूभूती निर्माण झाली होती. एकतर बाळासाहेबांच्या निधनानंतरची पहीली निवडणूक होती. शिवसैनीक आक्रमकतेने मैदानात उतरला होता. भाजपा ने शिवसेनेचा विश्वासघात केला अशी महाराष्ट्रातील सामान्य मतदाराची समजूत झाली होती. या निवडणूकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः नेतृत्व करीत असल्यामूळे साम, दाम, दंड, भेद यामध्ये सेनेपेक्षा भाजपा वरचढ ठरला. आणि महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठे फेरबदल झाले. कालपर्यंत राजकारणांतला मोठा भाऊ म्हणून वावरताना शिवसेना छोटा भाऊ झाला, तर लहान भाऊ मोठा झाला.

या निवडणूकीचा शिवसेनेवर मोठा परिणाम झाला. निवडणूक निकालानंतर काही तासातच राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या भल्यासाठी आम्ही भाजपा ला विनाशर्त पाठिंबा देऊ असे जाहीर केले. यामुळे शिवसेनेला आपल्या भूमिका पार पाडत असताना अनेक मर्यादा आल्या. शिवसेनेशिवाय भाजपा ने बहूमत सिद्ध केले. शिवसेना विरोधी पक्ष म्हणून कार्य करू

लागली. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून भाजपावर विशेषकरून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर मोठ्याा प्रमाणात टिका झाली. महाराष्ट्रातील जनतेने शिवसेना-भाजपा ने एकत्रीत यूतीचे सरकार स्थापनण्यासाठी कौल दिला होता. काही दिवसानंतर सेना सरकारमध्ये सहभागी झाली.

सहभागी झाल्यानंतर सेनेला राजकीय दृष्ट्याा कमी महत्त्वाचे खाते प्राप्त झाली. तेव्हापासून सेना नेतृत्व भाजपावर नाराज होवून, सत्तेत असूनही विरोधी पक्षाची भूमिका पार पाडत आहे.

नुकत्याच २०१७ मध्ये झालेल्या स्थानीक स्वराज्य शासन संस्थेच्या निवडणूकीत भाजपाच नंबर वन ठरल्यामूळे शिवसेनेपुढे अनेक राजकीय आव्हाने निर्माण झाले आहेत. सर्वांत प्रतिष्ठेची मुंबई महानगरपालीकेतही भाजपा ने चांगली कामगिरी पार पाडली. या निवडणूकीत भाजपा ८२ जागा आणि शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या. भाजपाने उत्तूंग यश प्राप्त केल्यामूळे शिवसेनेच्या मूंबईतील वर्चस्वाला धक्का बसला आहे.

मुंबई महानगर पालिकेचा महापौर शिवसेनेचाच होणार असे उध्दव ठाकरे जाहीरपणे सांगत होते. महानगर पालिका निवडणूकीच्या प्रचारादरम्यानच्या काळात शिवसेना-भाजपा यांच्यातील संबंध संघर्षाचे झाले होते. देवेंद्र फडणवीस व उध्दव ठाकरे यांनी परस्परावर वैयक्तिक स्तरावर टिका केली होती. भाजपाच्या नेत्यांनी तर मुंबई महानगरपालीकेतील भ्रष्टाचारात थेट मातोश्रीचा हात आहे असे आरोप केले. याच काळात सेना मंत्री जाहीरपणे सांगत होते राज्य सरकार नोटीस पिरेडवर आहे. महाराष्ट्रात राजकीय अस्थीरता निर्माण झाली होती.

भाजपाने महापौर निवडणूकीच्या अगोदर घोषित केले की, भाजपा मुंबई महापौर, स्थायी समिती कोणत्याही प्रकारची निवडणूक लढवणार नाही. तसेच सेनेला गरज पडल्यास विनाअट पाठिंबा देणार असे जाहीर केले. यानंतर मुंबईचा महापौर सेनेचाच होणार हे स्पष्ट झाले. व महाराष्ट्रातील फडणवीस सरकारवरील राजकीय अस्थीरतेचे संकट दूर झाले.

आजही वर्तमान परिस्थितीत सेना नेतृत्वापुढे कोणती भूमिका घ्यावी यावरून संभ्रम असल्याचे दिसते.

नोव्हेंबर २०१७ मध्ये राष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे. या निवडणूकीत भाजपाला सेनेचे जवळपास २५ हजार मतमूल्य पाहिजे असल्याने भाजपा सेनेपुढे नरमाईचे धोरण स्विकारताना दिसून येत आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेत्यांना पंतप्रधान मोदींनी दिलेल्या स्नेहभोजनाला उध्दव ठाकरे उपस्थित होते. यानंतर त्यांनी दिलेली प्रतीक्रिया ही महाराष्ट्राच्या राजकारणाची वास्तविक चित्र सांगणारी आहे. कासव गतीने शिवसेना भाजपा यूती रूळावर येत आहे. भविष्यात सेनेला महाराष्ट्रात भाजपा पुढे जाण्याचे फार मोठे आव्हान निर्माण झाले आहे. शिवसेनेची भूमिका राज्याच्या राजकारणात दिवसेंदिवस मर्यादीत होताना दिसून येत आहे. तर भाजपाचे आव्हान सेनेपुढे निर्माण झाले आहे.

### *संदर्भ सूची*

१.सुहास पळशीकर, २००६, भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण, साधना प्रकाशन.
२.व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, १९९६, महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन.
३.पळशीकर सुहास, नितिन बिरमल, २००४, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन.
४.सुहास पळशीकर, २००७, सत्तासंघर्ष, समकालीन प्रकाशन
५.कुलकर्णी सुहास, १९९१, मंडल आयोग व महाराष्ट्रातील तिकीट वाटप, समाज प्रबोधन पत्रिका.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org